# <u>भारताच्या घटनेच्या रचनेविषयी लोकप्रिय टीव्ही सिरीयल</u>

अरुण जेटली
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

20 फेब्रुवारी,2014 रोजी राज्यसभेतून निवृत्त झालेल्या सदस्यांसाठी एक औपचारिक निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. त्या समारंभाची विशेषता अशी होती की त्यात भारताच्या घटनेच्या निर्मितीवर 'संविधान'शीर्षका खाली नवी बनविण्यात आलेली टीव्ही सिरियल दाखविण्यात आली. या मालिकेची निर्मिती राज्य सभा टीव्ही साठी करण्यात आली होती आणि राज्यसभा सचिवालयाद्वारे त्यास पाठबळ पूर्णपणे देण्यात आले आहे.

या मालिकेचे दिग्दर्शन भारताच्या सर्वात उत्कृष्ट फिल्म निर्मात्यांपैकी एक अशा शाम बेनेगल यांनी केले आहे. शाम बेनेगल यांनी स्वतः सुद्धा राज्यसभेत सहा वर्षांसाठी नियुक्त सदस्य म्हणून सेवा दिलेली आहे. त्यांनी सिनेमा आणि थिएटर साठी अनेक सुप्रसिद्ध अभिनेत्यांसह काम केले आहे. सुरुवातीस ती राज्यसभेत टीव्ही वर प्रसारित करण्यात येईल जी दहा भागांची सिरीयल आहे. प्रत्येक एपिसोडची वेळ एक तासाची असेल. सिरीयल रेकॉर्डींग दरम्यान संसदेच्या सेंट्रल हॉलची प्रतिकृती मुंबईच्या एका स्टुडियोत बनविण्यात आली होती. हि प्रतिकृति हुबेहुब सेंट्रल हॉल सारखीच दिसते. त्यातील साज-सामान, फोटो फ्रेम, मंच, सेंट्रल हॉल ओरिजनल सारखेच बनविण्यात आलेली आहे. सिरीयलमध्ये डॉ. राजेंद्र प्रसाद, प्रमुख मसुदा लेखन समिती अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर, जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, मोहम्मद अली झीणा, गोविंद वल्लभ पंत, राजकुमारी अमृत कौर, मौलाना अब्दुल कलाम आझाद, एन गोपालस्वामी अय्यंगार वगैरे चर्चा करताना दाखविण्यात आले आहेत.

राज्यसभेत त्या सिरीयलच्या एका एपिसोडची झलक पाहावयास मिळाली. आता त्याचे प्रसारण कधी होईल हे पाहण्यासाठी मी आतुरतेने वाट पाहत आहे. ती स्क्रीन वर भारताच्या घटनेची सर्वात मोठी लोकप्रिय गोष्ट बनेल यात काडीमात्र शंका नाही. ईतिहासाच्या पुस्तकापेक्षा स्क्रीन वर दाखविल्यास याविषयी लगेचच आत्मसात केले जाऊ शकते. राज्यसभा सिरियलचे सर्व खर्च अंदाजपत्रकात दाखविण्यात आले आहे याबाबत कोणताही नफा मिळविण्याचा उद्देश नाही. राज्यसभा टीव्ही वर प्रारंभिक प्रसारणानंतर सर्व अन्य माध्यमांत ते सादर केले जाईल. आता ती सिरीयल दूरदर्शनवर सुद्धा सादर केली जाईल. त्याविषयात ज्यांना रस असेल त्यांनी ही सिरियल पाहायलाच पाहिजे. खास करून सर्व निवडून आलेले राजकीय प्रतिनिधी, राजकीय कार्यकर्ता, मिडीयाकर्मी, विद्वान आणि विद्यार्थी यांनी जरुर पाहावे अशी ही सिरियल आहे. संपूर्ण जगात लोक पाहू शकतील यासाठी ती यु ट्युब वर उपलब्ध करायला पाहिजे.

एका खाजगी न्यूज चॅनेल वर सिरियल 'प्रधान मंत्री' चे एपिसोड सुरु होणार आहेत. ईतिहसाच्या सादरीकरणासाठी डिजीटल माध्यम शिक्षणाप्रमाणे सेवा देत आहे. 'प्रधाम मंत्री' आणि 'संविधान' ची गुणवत्ता प्रेक्षकांना आकर्षित करतील अशा आहेत. आशा आहे की त्या भारताच्या हिस्ट्री चॅनेलची सुरुवात बनतील.